# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यार्थी व समाजहिताचे महत्वपूर्ण निर्णय

पुणे, दि. २५ एप्रिल २०२६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात संपन्न झाली. या सभेत विद्यार्थी कल्याण, शैक्षणिक गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकी विचारात घेऊन अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील आर्थिक अडचणींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानधनात प्रति तास रु. ५५ वरून रु. ६५ अशी वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे विद्यापीठावर सुमारे एक कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजनेचा करार करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी ४० लाखांच्या निधीची तरतूद करण्यात आली. तसेच विविध परीक्षांच्या आयोजनादरम्यान विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना सुचवण्यासाठी प्राचार्य नितीन घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

विद्यापीठ आवारातील शैक्षणिक विभागात करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करून ते रु. ४०,००० वरून रु. ५०,००० करण्यात येणार असून, यामुळे गुणवत्तापूर्ण अध्यापनाला चालना मिळणार आहे. विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील सुविधा अधिक

सक्षम करण्यासाठी Ruby Hall Clinic समवेत येत्या वर्षात देखील करार करण्यात येणार असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना विविध वैद्यकीय सुविधा व आपत्कालीन सुविधा उपलब्ध होणार आहेत

अहिल्यानगर उपकेंद्राच्या सक्षमीकरणासाठी शैक्षणिक समन्वयकाची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे दर्शनी भागातून प्रभावी दर्शन व्हावे यासाठी परिसर सुशोभीकरण आणि आवश्यक उपाययोजना करण्यासाठी डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

याशिवाय, भारतीय शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्थेच्या CSR उपक्रमांतर्गत विद्यापीठ परिसरात सुमारे ३ एकर जागेवर जागतिक दर्जाचे नृत्य संकुल उभारण्यासाठी तत्वत: मान्यता देण्यात आली असून, यासंदर्भात सविस्तर आराखडा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर संकुलाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ख्यातनाम कलावंत व प्रयोगजीवी कलेचे अभ्यासक विद्यार्थी यांच्यात सुसंवाद घडवून येईल

**विद्यार्थी हित, शैक्षणिक दर्जा उंचावणे आणि सांस्कृतिक विकास या तिन्ही बाबींचा गतिमान प्रशासनाद्वारे समतोल साधणाऱ असल्याचे या निर्णयाद्वारे अधोरेखित होत आहे - प्रा. डॉ. सुरेश गोसावी, मा. कुलगुरू**